म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६७८
१९६५

# मराठी माती



कुसुमाग्रज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 3449 वि: काव्य
क्रमांक २६७८ नों दि २४-९-५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 28628

# मराठी माती

कुसुमाग्रज

प्रकाशक

रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७३९ बुधवार, पुणें २

मुद्रक

वा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

चित्रकार : दीनानाथ दलाल

© वि. वा. शिरवाडकर

किंमत चार रुपये पन्नास नये पैसे

# मराठी माती


| | | |
|---|---|---|
| १ | मराठी माती | ११ |
| २ | नौका | १४ |
| ३ | वीज | १६ |
| ४ | कलंदर | १८ |
| ५ | अव्यक्त | १९ |
| ६ | धीर | २० |
| ७ | गंगावतरण | २३ |
| ८ | पालखी | २५ |
| ९ | कोठून कुठें | २६ |
| १० | पहाटपक्षी | २७ |
| ११ | वारा | ३२ |
| १२ | गुराखी | ३४ |
| १३ | रे परत पांखरा | ३६ |
| १४ | सांज | ३८ |
| १५ | संवाद | ३९ |
| १६ | निळ्या गडावर | ४२ |
| १७ | छाया | ४३ |
| १८ | एखादा दिवस | ४५ |

| | | |
|---|---|---|
| १९ | बंधन | ४६ |
| २० | आकाशकन्या | ४८ |
| २१ | आराधना | ५० |
| २२ | नदीकिनारीं | ५२ |
| २३ | परंतु | ५४ |
| २४ | तुझें गीत | ५५ |
| २५ | नाहीं | ५७ |
| २६ | रहस्य | ५९ |
| २७ | आठवण | ६१ |
| २८ | भीति | ६३ |
| २९ | बंदीवान | ६४ |
| ३० | दिलासा | ६६ |
| ३१ | शिलारूप मी | ६८ |
| ३२ | आहे ती व्यथेची | ६९ |
| ३३ | मस्तानी | ७१ |
| ३४ | देव्हारा | ७२ |
| ३५ | अशब्द | ७३ |
| ३६ | मीलन | ७५ |

३७ कधीं गमे कीं ७७
३८ प्रवासी ७८
३९ अलौलिक ८०
४० गोपी ८१
४१ शकुन्तला ९०
४२ उल्काकारास ९२
४३ वणवा ९३
४४ इथें वसाहत ९४
४५ यज्ञदेवता ९६
४६ यमकें ९८
४७ दीप लाव तो... ९९
४८ गाडीवाला १००
४९ वर आणि शाप १०३
५० त्यांच्यासाठीं १०५
५१ रंग १०६
५२ बांधकाम १०८
५३ अहेर १११
५४ स्मरण ११३

| | |
|---|---|
| ५५ केव्हां | ११५ |
| ५६ विजय | ११६ |
| ५७ करा दूर जरा हात– | ११७ |
| ५८ अंतर | १२० |
| ५९ दिवसासह सरले | १२१ |
| ६० दान | १२२ |
| ६१ अभिसारिका | १२३ |
| ६२ मूर्ति | १२५ |
| ६३ मातीचें गायन | १२६ |
| ६४ कारण | १२७ |
| ६५ यात्रिक | १२८ |
| ६६ आम्ही दोघे | १३० |
| ६७ वन्दन | १३२ |
| ६८ घरमालक | १३४ |
| ६९ नव्या जीवनाचा नाद | १३६ |
| ७० ध्वजगीत | १३८ |
| ७१ सह्याद्रि | १४० |
| ७२ कांहीं जीवनलहरी | १४३ |

# मराठी माती

## मराठी माती

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगानें जागल्या
दऱ्याखोऱ्यांतील शिळा.

हिच्या कुशींत जन्मले
काळे कणखर हात
ज्यांच्या दुर्दम धीरानें
केली मृत्यूवरी मात.

कडे कपारींत उभीं
हिच्या शिवाचीं देवळें
तेज सरितांमधून
स्वाभिमानाचें ओहळे.

माझ्या मराठी मातीला
नका म्हणूं हीन दीन
स्वर्गलोकाहून थोर
मला हिचें महिमान.

दिवा झोपडींत मंद
पेटे त्यावर मशाल
तिच्या दीप्तीनें उजळे
घर देशाचें विशाल.

महाराष्ट्र-साहित्य-परिषद
परीक्षा वर्ग, केंद्र ठाणें.
म. ग्रं. सं. वाचनालय शाखा

रत्नजडित अभंग
ओवी अमृताची सखी
चारी वर्णांतुनि फिरे
सरस्वतीची पालखी.

येथें देवाचें मंदिर
नाहीं श्रीमंत सोनेरी
हिच्यासाठीं रमापति
राहे वाळवंटावरी.

रसरंगांत भिजला
येथें शृंगाराचा स्वर
येथें अहंता द्रवली
झालें वसुधेचें घर.

माझ्या दरिद्री मातीचा
नका करूं अवमान
हिच्या दारिद्र्यांत आहे
भविष्याचें वरदान.

येथें फडकला झेंडा
विळ्याकोयत्यांच्यासाठीं
खड्ग खंबीर राहिलें
सदा कंगालांच्या पाठीं.

अनुक्रम ..3...
क्रमांक ...१५७८ ओ. दि. ... 14-

नाहीं पसरला कर
        कधीं मागायास दान
स्वर्णसिंहासनापुढें
        कधीं लवली ना मान.

हिच्या गगनांत घुमे
        आद्य स्वातंत्र्याची द्वाही
हिच्या पुत्रांच्या बाहूंत
        आहे समतेची ग्वाही.

अन्यायाची सुलतानी
        कधीं हिनें ना साहिली
आहे मृत्यूच्या दाराशीं
        हिच्या श्रद्धेची हवेली.

माझ्या मराठी मातीचा
        लावा ललाटास टिळा
हिच्या संगें जागतील
        मायदेशांतील शिळा.

# नौका

सरस्वतीच्या नौका या
युगयात्रेस निघाल्या
शुभ्र शिडांच्या पाकळ्या
महाशून्यांत फुलल्या.

करी हर्षाची लावणी
मंद सुगंध समीर
लाल तेजानें कोंदलें
निळें नभाचें मंदिर.

रत्नाकरांत हेलावे
हिऱ्यामाणकांचें पाणी
गाई वत्सल किनारा
आशीर्वचनांचीं गाणीं.

चार दिशांच्या देवता
उभ्या देहलीवरती
हातीं मेघांचीं तबकें
त्यांत ज्योतींची आरती.

अशा सोहळ्यांत झालें
खुलें अपाराचें द्वार
तिन्ही काळांचा रंगला
धुंद झपूर्झा समोर.

नौका चालल्या चालल्या
दूर बंदरापासून
जीवापासून जाहलें
आतां वेगळें जीवन.

हीन मलीन नश्वर
सारें किनाऱ्यास गळे
दिव्य प्रतिभेची ज्योत
युगायुगांत पाजळे.

## वीज

नका मलीन मार्गांचा
सांगूं दिमाख मजला
मला आकाश–ज्योतीला
शांत सुखाची शृंखला !

वैर सुस्थिरपणाचें
वैर स्थितीचें निवान्त
दहा दिशांचा प्रदेश
माझ्या धावेस अशान्त

सुख थिजलें भिजलें
नित्यपणांत गंजलें
अभिलाषा न अशाची
स्वैरपणांत रंगलें !

जातें जळत जाळत
कृष्ण घनांच्या कुशींत
नाच काळोखावरती
कधीं करतें खुशींत !

माझ्या हातांत मशाल
माझ्या मनांत निखारा
माझ्या बेहोषपणाला
नाहीं कोठेंहि किनारा !

न मी नक्षत्रदीपिका
    कोणा देवाच्या पूजेची
राणी सोज्ज्वळ सात्त्विक
    नाहीं कोणाच्या शेजेची !

मला अनेक वल्लभ
    नाहीं कोणीहि भ्रतार
दान दास्याचें करील
    त्यास दाहक कट्यार !

नाहीं पांखराप्रमाणें
    घरकुलांत निवास
माझा निःसंग निर्भय
    साऱ्या विश्वांत विलास !

सूर्यतेजांत चंद्राचे
    कांहीं किरण रापले
झंजावाताचे सहस्र
    वेग तयांत मापले—

माझ्या जन्माची कथा ही
    कसें साहीन बंधन ?
तीरावांचून वाहतें
    माझें तेजाळ जीवन !

## क लं द र

माझ्या साम्राज्यांत आतां
मीच भूप मीच प्रजा
माझ्या देवळांत झालों
मीच देव मीच पूजा.

माझ्या मनांत शलाका
विश्वगर्भ आकाशाची
माझ्या प्रश्नेंतुनि उदे
भागीरथी प्रकाशाची.

दूरतेला आली आतां
माझ्यापाशीं जवळीक
धरतीच्या मातीमधें
स्वर्गाशीं हो सोयरीक.

नीतिरीतीची देहली
गेलें ओलांडून मन
मुक्ततेंत झालें साऱ्या
शृंखलांचें विसर्जन.

माझ्या आत्मतेस नाहीं
आतां अहंतेचा पार
झालें अनंताचें घर
त्याला जीवनाचें दार.

# अ व्य क्त

तुझ्या माझ्या संवादास
नाहीं अर्थ नाहीं मेळ
काळोखाच्या माळावर
चाले ठिणग्यांचा खेळ !

येतो वाजत गाजत
कधीं अक्षरांचा जथा
लपे आडोशाला दूर
मान लववुनी व्यथा.

केव्हां कलगी तुऱ्यांचे
जाबसवाल रंगती
त्यांच्या कर्कश नादांत
अर्थ लाजरे लोपती.

यांतूनहि जाणवे जें
त्याचा दिलासा मनास
पूर्णाकारासाठीं पण
निराकार हें उदास !

# धी र

आहे मुलखावेगळा
माझा मुलूख दूरचा
तेथें मुशाफिरा तुला
धीर आहे का यायचा ?

दूरदुरून चोरून
मला घातलास डोळा
कधी जवळीक होतां
केला अंचलाशीं चाळा.

माझ्या गालाओठावरी
कांहीं कैवल्याचें दंव
दिसे तुला, टिपाया तें
तुझे आतुरले भाव !

जेव्हा मालवती दिवे
धरा मौनावते सारी
तुझी छाया थरथरे
माझ्या राहुटीच्या दारीं.

मला उमगल्या पांथा,
तुझ्या प्रणयाच्या खुणा
आता मीलनाच्या मार्गी
तुझा धीर मात्र उणा !

वाट बिकट पुढची
खोल तुटलेले कडे
कोठे दावानल पथीं
घाली निखाऱ्यांचे सडे.

तिथे निर्जनाचा नाग
फणा काढोनिया बसे
फुटे कुचेष्टेचें क्रूर
बुंध्याबुंध्यावर हसें !

जाती पेटवीत थडी
अग्निसरितांचें जळ
त्यांत वल्हवाया नौका
हवें अंतराचें बळ.

अशा प्रदेशाच्या पैल
माझा महाल जांभळा
त्यांत मेघमंचावरी
घडे मीलन सोहळा.

भुलणारे भुलवावे
माझ्या नांवाची ही ख्याती
माझ्यापायीं कितीकांच्या
झाली जीवनाची माती !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ........

माझी संगत धरतां
ठरे ललाटाचा लेख
घ्यावा सर्वनाश किंवा
घ्यावें स्वर्गीय तें सुख.

देतें म्हणून इशारा
माझा मुलूख दूरचा
तेथे मुशाफिरा तुला
धीर आहे का यायचा ?

## गं गा व त र ण

गंभीर शिवाचें गर्जित घुमलें व्योमीं
थरथरले दिग्गज दिशा हालल्या ढळल्या
दिन-निशा जाहल्या घरंगळोनी एक
विस्कळती गगनीं नक्षत्रांचे पुंज !

शतभंग जाहले वर स्वर्गाचे कोट
उघडलीं कवाडें सहस्र लखलखणारीं
हिमधवल जलाचे उसळत त्यांतुनि लोट
धडधडत जान्हवी भूगोलावर आली !

निःशब्द होउनी बघती सात समुद्र
भयचकित जाहले विशाल पर्वत सारे
वादळें राहिलीं उभीं जागच्या जागीं
रविचंद्र विसरले उदयास्ताचे बंध !

विसरल्या उमलणें अर्धोन्मीलित कलिका
थांबले नद्यांचे आणि झऱ्यांचे ओघ
बर्फाच्या खंडापरी थिजोनी मेघ
राहिले तरंगत विसरुनि पंथ प्रवास !

ती स्वर्गवाहिनी अमल जिच्या पात्रांत
प्रतिबिंबित झाले अमरांचे प्रासाद
पथि रत्नाच्छादित जिच्या किनाऱ्यावरती
चिरवसंत फुलवी कल्पलतांचे बाग !

त्या नितळ जलांतुन सुरांगनांचे मेळे
नाहती, तयांच्या सौंदर्याचा संग
करि पुलकित लहरी, गंधलेप ओघळुनी
परिमळले, झाले रतिमय नीरतरंग !

पद प्रक्षाळित जी केवळ अमरपतीचे
वच जिनें मानिलें वंद्य मात्र वरुणाचें
शिवशब्द ऐकुनी धुसफुसली, थरथरली
जाहली अखेरीं अगतिक आली खालीं !

स्वर्गातुनि पडल्या शत तडितांच्या राशी
कीं वितळुनि पडले पर्वत हे स्फटिकांचे
सामर्थ्य सुरांचें भूवर वाहत आलें
दीप्तीच्या उधळित प्रखर शलाका भोंतीं !

तो दिव्य पराभव ! विजय दिव्य धरतीचा !
त्या भगीरथाचा, अवघ्या नरजातीचा
तो अमृतरस जो जीवन दे देवांना
स्वर्गता घेउनी पृथ्वीवर अवतरला !

अमरत्व लोटलें मर्त्य मानवासाठीं
मांगल्य धांवलें अमंगलास मिळाया
तो ओघ सुधेचा वळला, उसळत आला
समृद्ध कराया हीनदीन ही माती !

# पा ल खी

पहाटच्या तिमिरांत दूरवर कुठल्या देवालयीं
घंटा निनादते आहे
त्या स्वरलहरींच्या स्कंधावर लाल पालखी ही
कुणाची हेलावत राहे !

मम नगराच्या वेशीवरती रत्नदिव्यांच्या या
अचानक झगमगल्या माला
काळोखावर कनकफुलांचे उलगडले गालिचे
पथावर किनारल्या ज्वाला.

नीरवतेच्या गहन धुक्यांतुनि रुणझुणल्या तारा
स्वरांकुर क्षितिजाला फुटले
धवलनील फुलवूनि पिसारा व्योमनदीच्या तटीं
नाचती नक्षत्रांचीं दलें.

अशा वैभवामधून मिरवित दिव्य पालखी ती
येतसे माझ्या दारावरी
किनखापी पडद्यांतुनि प्रकटे स्वर्गशलाकेपरी
सकंकण हात कुणाचा तरी !

# को ठू न कु ठें

कोठून कुठें आलास खगा,
केलेंस मनोहर कूजन रे
तीं रुमझुमतां तव नादफुलें
हें पुलकित झालें निर्जन रे !

जो दिव्य प्रकाश इथें न दिसे
जो पैलतटावर दूर वसे
चोंचींत तयाचे किरण तुवां
हें दान दिलें मज, वाहुन रे !

क्षण निर्घृणता ही गहिवरली
क्षण नीरवता ही थरथरली
ती नास्तिकता निखळून पडे
हृदयांत निनादे पूजन रे !

जातोस अतां जा, स्वप्न सरे
तो भास प्रदीप्त तमांत विरे
या जीवन–घटकेवरी तुझें
हो नांव चिरंतन मुद्रित रे !

## पहाटपक्षी

गाढ शांतता बसली होती धरतीला वेढुनी
होतें विसावलें जीवन

पहाटचा अंधार दाटला, सहज जागतां तुझें
आलें कानावर कूजन

तिमिराच्या कुहरांतुन गमला सोनेरी ओहळ
स्वरांचा धरतीवर वाहत

मुखरित होउनि गगन गात वा रिझवाया अंतर
झाली पहाट रोमांचित.

कीं नीरवतेच्या विषण्ण वेलीवर
हा अवचित फुटला वासंतिक मोहर
त्या गीतपरागीं रुमझुमलें अंबर

सरोवरावर संथ वाहतां रात्रीं मंदानिल
उमटे नाजुक आंदोलन

निजलेल्या कमळांच्या भंवती थरथरतीं वर्तुळें
पांखरा, तसें तुझें गायन!

युगपुरुषांची विशाल प्रज्ञा जी रात्रीं जागते
जळते, दीप जगा दाविते

कलाप्रभूंची सुपर्ण प्रतिभा जड संसारांतुनी
धागे दीप्तीचे ओविते

तीच काय साकार होउनी अथांग नीलामधें
विहरते नक्षत्रांच्या कुलीं
सात मुनींसह हितगुज करते, व्याधासह धावते
नाहते व्योमनदीच्या जलीं

भग्नाश होउनी वा जीवनसंगरीं
मखमली घनांच्या निळ्या बिछान्यावरी
विश्रांत व्हावया जाई घटकाभरी !

आद्य ऋषींच्या हृदयामधली वा महदाकांक्षा
शोधण्या विश्वाचें कारण
एकान्तांतुन करित चालली सामगीतगायन
जडाचें ओलांडुनि कुंपण !

नभार्णवांतिल दिव्य नाविका, कुठल्या देशाकडे
स्वरमय प्रवास तव चालला
कुठलें बंदर किरणशलाका पसरुनि हिरव्या निळ्या
बाहतें अनंतांतुनी तुला
पैलथडीला क्षितिजाच्या वा यक्षांचें नंदन
तयाच्या काय किनाऱ्याकडे
इंद्रधनूच्या उंच कमानी वेशीवरतीं जिथें
जेथें कल्पफुलांचे सडे

रसरसून जेथें पुनर्वेपरि यौवन
नि:शंक विलसतें वृद्धत्वावांचुन
हो सदैव जेथें नवतेचें सिंचन

कविकुलगुरुची विहग कल्पना जेथें मेघासह
गेली धनेश्वराच्या पुरीं
चंद्रकिरण का वेंचुन केलें तेथें घरटें तुवां
कोठल्या अशोक वृक्षावरी !

श्रमित दलित जे त्यांच्या निद्रित नयनांपुढती सख्या
चितारुनि सोन्याची द्वारका
विद्ध मनांना कुरवाळुनिया असंख्य शेजेवरी
दावुनी आशेच्या तारका
शिणून भागुन उदारहृदयी स्वप्नांची मालिका
नभांतुनि माघारीं चालली
सोबत करसी का स्नेहाची, कृतज्ञतेनें तयां
अर्पिसी मंजुळ गीतांजली !

एकाकी शय्येवरी कुणी कामिनी
वैरीण जाहली निद्रेविण यामिनी
पापण्या पहांटे शिणलेल्या मिटवुनी
उषःस्वप्न तें असेल परतत त्याच जमावांतुनी
करूनी प्रणयाची पूर्तता
करी तयाला साथ उदारा अमुच्या जगतामधें
राहे स्वप्नांतच रम्यता !

पूर्वरात्रिं वा क्षितिजावरती चंदेरी पुष्पक
घनाचें घेउनि ये हिमकर

वसुंधरेचा प्रियकर, बाहू पसरुनिया शीतल
धरिलें तिजला हृदयावर

स्तनापरी हो उन्नत पर्वत स्पर्शानें पुलकित
सुखाच्या लहरी देहांतुन

अधरासम ती रसमय सरिता, होइ चंद्रिकामय
घेतां चंद्रानें चुंबन

उन्माद प्रीतिचा घटकाभर दावुनी
तो निघून गेला निर्दय गगनांतुनी
विरहाच्या तिमिरीं गुदमरली मेदिनी

दूत तिचा तूं प्रवास करसी क्षितिजाच्या खालती
शोधण्या चंद्राचें मंदिर

त्यास कथाया अवमानित त्या हृदयाची वेदना
गुंफण्या ओघळलेला सर !

अथवा काळोखांत बुडालें अशेष अमुचें जग
जाहलें निद्रेच्या अंकित

तूंच राहसी जागृत करसी गगनांतुन पाहरा
राखण्या पृथ्वीचें संचित

पहांट होतां पूर्वदिशेचें सळसळलें अंतर
लागली मात्र तुला चाहुल

उजळित अवघें त्रिभुवन येइल तेजाची जान्हवी
पावन होइल उदयाचल

लखलखतीं द्वारें क्षितिजाचीं खोलुनी
तो प्रकाशदाता बसेल सिंहासनीं
दुमदुमतिल जगतीं पुन्हा जीवनध्वनी
चराचरांना पुन्हां हरपल्या मिळतिल रंगाकृति
येइल सौंदर्या जागृति
तिमिरामधुनी करावयाला स्वागत जासी पुढें
गात त्या तेजाची आरती !

## वा रा

कुठल्या मुलखामधून येसी – कुठल्या मुलखा जासी
गगनपथाचा स्वैर मुशाफिर – वसुधेचा रहिवासी !

रसिक सख्या, विकसित सुमनांतिल
चुंबुनि घेसी सुगंध कोमल
ताल तरूच्या पर्णगुहांतुन
गीत रांगडें गासी !

उदार हृदयें चतुर नाविका
निळ्याजांभळ्या जमवुनि नौका
दर्यावरची तूं जलदौलत
तृषित धरेला देसी !

वसन रेशमी नील मनोहर
लेउन सरिता गाते सुस्वर
ओढसि अंचल अगणित लहरी
उठती स्पर्श-विलासीं !

उग्र भयानक कधीं रूप तव
महेश्वरापरि करिसी तांडव
जटा धरोनी उचलसि सागर
पडतो विकल पदाशीं !

महाराष्ट्र-साहित्य-परिषद
परीक्षा वर्ग, केंद्र ठाणें.
म. ग्रं. सं. वाचनालय
३८८९ दि: ३८८५
२६-९-८५
६०८

जीर्ण देवळींमधून गायन
स्मशानभूमीवरती नर्तन
मिसळुनिया चांदण्यांत देसी
प्रणयरतां सुखराशी

नच तूं येथिल त्या देशांतील
कुठें न होई स्थिर तव पाउल
रंगमहालामध्यें केधवा
केव्हां तूं वनवासी !

निराकार जो परम चिरंतन
अशेष विश्वा उरला व्यापुन
काय तयाच्या अधिराज्याची
देत दवंडी फिरसी !

कुठल्या मुलखामधून येसी – कुठल्या मुलखा जासी !

# गु रा खी

त्या अफाट कुरणावरी
फिरे हा कोण गुराखी तरी
अवकाशांतुन घुमवित अपुली
मधुमंजुळ बासरी !

संगीतरवासंगती
भोंवती खिल्लारें नाचती
अगणित लहरी आनंदाच्या
दीप्तिरूप होती !

आकाशनदीच्या जळीं
भागवी तृषा, कधीं सावली
कधीं विसावत गहन नील :
वट वृक्षाच्या तळीं !

गगनांतुनि वर्षेस्तव
जांभळ्या मेघांचें मांडव
त्यांत हिंडतो अलीप्रमाणें
करीत गुंजारव !

उग्रता केधवा धरी
विजेचे उडवित आसुड करीं
हाकारित हा गर्जत धावे
वादळ वाऱ्यापरी !

हो गूढ तयाचें मन
एक त्यां स्वेच्छेचें बंधन
घेउनि फिरतो अनाद्यन्त हा–
धवल निळें गोधन !

## रे परत पांखरा

रे परत पांखरा परत, पातला संधिकाल भूवरी
तिमिरजाल पसरण्या सिद्ध हो क्षितिजावर शर्वरी !

त्या दिनकमळाची शेवटची पाकळी
कोमेजुनि पडली मावळतीच्या तळीं
खिल्लार परतलें किरणांचें गोकुळीं
धुमसत येती कृष्ण सावल्या मूक भुजंगापरी !

तेजासह गेले वाहुनि कोलाहल
मौनाची उरली उदासता श्यामल
आकृती निखळती अवघ्या सृष्टींतिल
रंग विरुनिया, गहन उलगडे काळोखाची दरी !

तूं रसिक मुशाफिर, रसरंगीं न्हाउनी
गति हाच मानला धर्म सदा जीवनीं
ना पंख थबकले कुठल्याही बंधनीं
देव तुझा नित तुवां पाहिला नीलाच्या मंदिरीं !

त्या सदय तरूंचा जीव तुझ्यावर जडे
तुजसाठीं भरले मधुर रसाचे घडे
सावलींत हिरव्या दहन उन्हाचें अडे
किती लतांच्या सेविलीस तूं कुसुमांतिल माधुरी !

वेचल्या उषेच्या केशरकणिका तुवां
लुटलास घनांतिल कधिं मोत्यांचा र वा
जलतरंग टिपसी सरोवरीं केधवां
सुवर्णरेषा कधीं स्वरांच्या चितारसी अंबरीं !

तव जीवित म्हणजे रसयात्रा ही एक
हो दिनादिनांचा भूतावरि अभिषेक
अदृश्य उद्याचा कुणीं वाचणें लेख
सफलतेंत ज्ञा आज यात्रिका, विसावण्या कोटरीं !

# सांज

ती सांज अकल्पित
अवतरली
आर्द्र घनांचे
श्याम जांभळे
पंख पालवित

मृदुल सावल्या–
मधे उन्हाचे
दिवे मालवित

निळ्या करांनी
मातीमधलें
स्वप्न जागवित

आर्त स्निग्धता चराचरावर
दहिवरली.

ती सांज अकल्पित
कुजबुजली
तरुपर्णांतुनि
रहस्य हिरवें
निथळे भूवर

धुंद तृणाच्या
करांत गवसे
गगनाचा कर

पर्जन्याच्या
दवांत भिजले
भक्तीचे स्वर
मनामनांतुनि गहन भावना
गजबजली.

ती सांज अकल्पित
मावळली
अलकेमधली
उन्मन वीणा
क्षणभर छेडुन

दोन किनारे
एक नदीचे
पळभर जोडुन

नक्षत्रांच्या
अक्षरमाला
जुळवुन तोडुन
अपार जलधीमधे तमाच्या
विरघळली !

## संवाद

उत्तर रात्रीं मीं
येऊन जाग
सहज बाहेर
पाहिलें जरा–

भुरक्या ढगाच्या
उशींत मऊ
घालून मस्तक
पहुडे धरा.

काजळी दुलई
सारून थोडी
जागृत होऊन
देखतां नभा–

मंचकाजवळ
शुक्राचा तारा
दिसला एकटा
राहिला उभा.

पुसे ती लाजून,
"अजून कां रे
गेलेला निघून
ताऱ्यांचा थवा–

" एकटा राहसी
उगाच येथें
उशाशीं घेऊन
हातांत दिवा ? "

म्हणाला हासून,
" प्रीतीची तुझ्या
अपेक्षा अंतरीं
मुळींच नाहीं—

" माहित मजला
हृदय तुझें
कोणाच्या नेत्रांत
गुंतून राही !

" परंतु जेधवां
क्षितिजावरी
येईल उषेच्या
रथांत रवि—

" न्हाऊन गर्दीने
सोडून निळीं
नेसून वसनें
सोनेरीं नवीं—

" जाशील थाटांत
लाजत पुढे
कराया स्वागत
आकाशद्वारीं–

" तुझी ती प्रसन्न
लावण्यप्रभा
पाहून माघारीं
जाईन घरीं ! "

# निळ्या गडावर

निळ्या गडावर तुझी पताका पुनवेच्या देवते,
नभोनदीच्या पैलतटावर वसे तुझे गांव तें.

नगरशिवेवर इंद्रधनूंचीं रम्य उभीं गोपुरें
मेघ–महालावरी माळले नक्षत्रांचे हिरे.

इंद्रनील जल सरितेमधुनी स्वप्नासम ओहळे
दोन थडींवर उसासलेले कल्पलतांचे मळे.

तिथें उभें तव कैलासापरि स्फटिकाचें मंदिर
सुवर्ण संध्या द्वार राखण्या उभी देहलीवर.

मिरवणूक तव नीलामधली काय तिचें वैभव !
अणुरेणूंच्या गाभ्यामधलें जागृत हो मार्दव.

स्पर्श सुधामय तुझा फुलवितो दहा दिशांच्या कळ्या
तलम प्रभेच्या काळोखावर उलगडती पाकळ्या.

ध्वजा रुपेरी अश्व रुपेरी तव रजताचा रथ
धूळ रुपेरी उडे अंबरीं तुझा रुपेरी पथ.

चराचरांना दान देत तूं जाशी गगनांतुनी
भक्तिभावना थरथरते मम विभव तुझें जाणुनी.

बंदिवान मी तिमिर, राहतों निबिड तरूंच्या तळीं
तुजसाठी आसवें गाळितों मृत डोहाच्या जळीं.

# छाया

एकला उजाड माळ
छातीस उन्हाचे तडे
अधीर नेत्रांनी राही
पहात आकाशाकडे.

श्यामल स्नेहल वर्षा
पातली दूरच्या नभीं
मेघांची दुंदुभी नादे
रत्नांची कमान उभी.

अपेक्षा थरारे उरीं
शीतल समीरासवें
सहस्र पाऊसधारा
देतील जीवन नवें !

वर्षेचे जांभळे ध्वज
दिसले क्षितिजावरी
सावळ्या मांडवामध्ये
नाचली चंदेरी परी.

अखेरी अंबर भरे
येई तो सुवर्ण क्षण
आशेने कातर झाले
माळाचे जळके कण.

हन्त तें सावळें स्वप्न
तसेंच विरून गेलें
सौभाग्य दुरून जाई
आकाश निरभ्र झालें !

सांत्वन माळास एक
पर्जन्य येथे न पडे
पडो न– परंतु छाया
लाभली, हेंही न थोडें !

अनुक्रम ३८६८९ वि: ९१८५४
नोंद दि: ३.११.५८

## एखादा दिवस

उसासे टाकीत जांभया देत
आज हा दिवस जाहला जागा
उदयगिरीच्या
निळ्या उशीवर
विषण्ण मस्तक रेलून राही
कोणत्या सुंदर स्वप्नाचा त्याच्या
तुटला धागा !

मेघांची सावळी जांभळी दुलई
विस्कटून त्याच्या पायाशीं लोळे
मधूनीच अंग
घेई लपेटून
अस्वस्थ मनानें पुन्हा दूर सारी
पापण्यांवरती रेंगाळे नीज
स्वप्नार्त डोळे !

विशीर्ण किरणपुष्पांच्या पाकळ्या
दिसती विलग मंचकावर
बाहुपाशांतून
गेली जी निघून
तिच्या स्मरणानें पुरूरव्यापरी
काय हा उदास व्याकुल, पुन्हा
कामनातुर !

## बंधन

पर्जन्यकालांतील एखादा दिवस
उगवतो असा –
अंधारप्रकाशाच्या सीमारेषा
सृष्टीला दिसत नाहींत
आकाशाला गवसत नाहींत.
सोनेरी कुंतलाची, भरजरी अंचलाची
आरक्त गालाची, तेजोमय भालाची
यौवनमत्त उषा
नवविधवेप्रमाणें अंगावर सावली पेहरून
केव्हां तरी येते
क्षितिजाच्या भिंतीवर क्षणभर डोकें टेकून
जड पावलांनी निघून जाते
गूढ विषण्ण रहस्यासारखी !

तीच गत दुपारची –
तिच्या विझलेल्या धुनींतील राखोडा
पसरतो साऱ्या अवकाशांत
आणि धुराळलेल्या हातानें ती बसते शोधीत
त्या राखेंतील आसन्नमरण निखारे !

संध्यासुद्धां –
अस्ताचलाच्या उंबऱ्यावर लाजत नाहीं
शुक्राचें नक्षत्र वेणीमध्यें माळत नाहीं

काळ्याजांभळ्या भ्रमिष्ट नजरेनें
बघत राहाते येणाऱ्या रात्रीकडे.
सारा दिवस जातो असा
रखडत थबकत मरगळत,
पिसें गळलेला, पंख तुटलेला
दीन दुबळा पक्षी !

शिसवी पोलादी रंगाचे अवजड मेघ
सुस्तावून
पडलेले असतात अवघ्या आभाळांत
घायाळ झालेल्या हत्तीसारखे
निद्रेच्या तीरावरील स्वप्नासारखे
ना जगणारे, ना मरणारे !

असा मरणोन्मुख दिवस
उगवला आहे आज
काळोखाचा द्रव झिरपत आहे
सहस्र धारांनी साऱ्या सृष्टीवर
माझ्या मनावर.
मला जीवनाशीं बांधून ठेवीत आहे
फक्त —
गतांत हरपलेला तुझा स्पर्श
तुझी आठवण.

## आ का श क न्या

आपुलें रहस्य —
आपुल्यासाठीं !
दूरस्थ तारका आकाशकन्या तूं
स्वर्गीय नदीच्या किनाऱ्यावरी
मेघांच्या कुंजाशीं
एकान्त बाजूला नभीं
एकटी उभी !
अमर वेलीचें प्रफुल्ल कुसुम
अमल दलांची
उघडे मंजुषा
सुनील हिमानी परागांतुनी
पसरे तमांत
प्रकाशगंध !

*                    *

चालतां रात्रीला एकाकी वाट
काळोख दाट —
सभोंतीं साचला धरित्रीवरी
गिळून रंग अन् आकार सारे !
दूरस्थ तारे
दूरच आकाशीं अज्ञेयापरी
त्यांतील तूंहि
परंतु तरीहि

वाटलें, रत्नांचा घेऊन दिवा
आकाशगृहाच्या दारांत उभी
माझ्याचसाठीं
देवता कोणी !

*        *

आभास सारा, स्वप्नच मिथ्या
ज्ञानास जाणीव —
वेगळीं विश्वें अन् वेगळे धर्म
आपणां दोघांचे.
खगोलशास्त्रज्ञ सांगती इथें
अमित अंतर आपुल्यामध्यें
प्रकाशवर्षांचें !
तुझिया रूपांत अपार अग्नी
फिरत राहे, ठाऊक आहे, —
परंतु गाजवी कल्पना आज
हृदयीं राज्य
कल्पना-कोषांत ज्ञान हो कैद
आणिक एकाच घटकेसाठीं
अंतर तुटून, भिन्नता लोपून
निशेच्या अंधेच्या मांडवामध्यें
आपण एक !

# आ रा ध ना

श्रावणमासीं माळावरचें
साठवुनी जल कांहीं
तळें जाहलें एक चिमुकलें
दौलत राखुनि राही !

मलीनता वर निवळुनि जातां
दिसली त्यास नभश्री
रम्य रूप पाहून, शांतिची
झाली हृदयिं इतश्री !

नेत्र खिळवुनी नभावरी तें
अविरत जागत बसलें
करीत आराधना तयाला
जीवन अन्य न उरलें !

निर्मल-हृदयीं सदा तयाच्या
चित्र नभाचें नाचें
अरुण केशरी कधीं रुपेरी—
बिंब कधीं चंद्राचें !

वाकवाकुनी कांठावरचें
गवत तयाला सांगे
येतां जातां मारुत लहरी
करिति तयाला जागे !

परंतु त्याची गाढ साधना
कधीं भंगली नाहीं
गगनचित्र हृदयांत धरोनी
अविचल पाहत राहीं !

श्रावण सरला, पुढें पेटला
भाद्रपदांतिल जाळ
जीवन विरलें, तळ्यांत उरला
ओला सुकला गाळ !

त्या प्रतिमेचे फुटके तुकडे
कांहीं दिन लखलखले
गाळावरती गतकाळाचें
स्वप्न तरंगुन गेलें !

हवेंत दाहक तेंही सरलें
अखेर झाली पुरती
उरली केवळ खूण तळ्याची
जखमेपरि भूवरती !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 78128

# नदी किनारीं

नदीकिनारीं ठेवुनिया घट आम्रतरूच्या तळीं
उभी ही लावण्याची कळी !

मखमली तृणावर मेंदीचें पाउल
मुखवैभव बघण्या डोकावति कुंतल
स्कंधाहुन ढळला अरसिक तो अंचल
शिरिं अबदागिर होउनि हलते हर्षानें डाहळी
उभी ही लावण्याची कळी !

लखलखे तनूवर नवतीचा भर नवा
आयनेमहालीं झगमगतो कीं दिवा
किरणांत उषेच्या नवरत्नांचा रवा
निळ्या जळावर उलगडली हीं पद्माची पाकळी
उभी ही लावण्याची कळी !

सृष्टींत विराजे अश्विन सिंहासनीं
ही सुता तयाची अवतरली, वेंचुनी
निजरूप फुलांतुनि नीरतरंगांतुनी
जनांत जाण्यास्तव ही सजली विजनीं दीपावळी
उभी ही लावण्याची कळी !

स्वर्गातुनि उतरे भूवरती जान्हवी
ये रतीस रुसवा, म्हणे मलाही हवी
रसिकांनीं भरल्या जगांतली थोरवी

शिवापरी ती आम्रतरूनें हृदयाशीं झेलली
उभी ही लावण्याची कळी !

कर एक कटीवर, अन्य कचाखालती
नजरेंतुनि लहरी ज्योत्स्नेच्या वाहती
रसराज घालितो प्रदक्षिणा भोंवतीं
तरुणारुण स्वप्नांचा द्रव या कुंभामधल्या जळीं
उभी ही लावण्याची कळी !

## परंतु

वावदूक हा म्हणुन गाजला
शब्दचतुर ही म्हणुन गाजली
परंतु येतां समोर, त्यांच्या
गळ्यांत सगळी भाषा थिजली !

धीट गडी हा त्यास न बंधन
ती प्रतिपादी बंधविमोचन
परंतु होतां भेट तयांचे
वळले खालीं लाजुनि लोचन.

ती सांगे मी अबला नाहीं
हा पुरुषार्थी पूजित राही
परंतु येतां तीं एकान्तीं
पराभवाची फिरली द्वाही !

चाचरला तो, चाचरली ती
शब्द मोडले ओठावरती
कुठें कर्म अन् कुठें क्रियापद
अखेर कळलें कीं ही प्रीति !

महाराष्ट्र-साहित्य-
परिषद, पुणे
म. ग्रं. सं. वाचनालय

## तुझें गीत

तुझें नितळ नाजूक
गीत आलें हें कुठून
परीप्रमाणें कोणत्या
फुलामधून उठून !

तुझ्या अक्षरपाकळ्या
दंवमालेंत भिजल्या
सांध्यघनाच्या कणिका
कानामात्रेंत थिजल्या !

कुठें पुनवचांदणें
दऱ्याखोऱ्यांत खेळलें
त्याच्या फेनाचे तुषार
तुझ्या शब्दांत माळले !

कुठें वेलींच्या जाळींत
जळ उन्हांत हालतें
त्याच्या लीलांचें लालित्य
तुझ्या ओळींत वाहतें !

तुझ्या गीताच्या पंखांना
सात रंगांचें सिंचन
आलें ओलेतें पांखरूं
इंद्रधनुष्याखालून !

तुझ्या गीतांच्या संगतीं
आला श्रावण समोर
माझ्या वैशाख-चैत्रांत
झालें हिरवें काहूर !

१६७८ १६-९

कांही बोलायाचें आहे
पण बोलणार नाहीं
देवळाच्या दारामधें
भक्ति तोलणार नाहीं.

माझ्या अंतरांत गंध
कल्पकुसुमांचा दाटे
पण पाकळी तयाची
कधी फुलणार नाहीं.

नक्षत्रांच्या गांवांतलें
मला गवसलें गुज
परी अक्षरांचा संग
त्याला मिळणार नाहीं.

मेघ जांभळा एकला
राहे नभाच्या कडेला
त्याचें रहस्य कोणाला
कधी कळणार नाहीं.

दूर बंदरांत उभें
एक गलबत रुपेरी
त्याचा कोश किनाऱ्यास
कधी लाभणार नाहीं.

तुझ्या कृपाकटाक्षानें
झालों वणव्याचा धनी
त्याच्या निखाऱ्यांत कधीं
तुला जाळणार नाहीं.

## र ह स्य

तुझ्या प्रीतीचें रहस्य
सदा रहस्य रहावें
काय तमानें केधवा
सूर्यमंडळ पहावें !

प्रीति भक्तीचा अंकूर
नाहीं प्रकाशीं फुलत
पडे खालती पापणी
पहावयास दैवत !

चोर आपण कशास
लाज चोरीची धरावी
कलंदरांनीं काय ती
रीत थोरांची वरावी !

जेव्हां अवघा संसार
होई निद्रेच्या आधीन
जाती आकाश-शून्यांत
शब्दप्रवाह लोपून—

आडवाटेनें वनांत
येतों काजळ अंधारीं
होई मीलन आपुलें
काळ्या नदीच्या किनारीं !

तुझ्या बाहूंच्या मिठींत
रात्र चुरते सरते
तुझ्या स्पर्शांत श्वासांत
सारें जीवन उरतें !

जग जागतें सकाळीं
जागीं आपुल्या आपण
जरी भेटलों मार्गांत
नाहीं ओळख, भाषण !

## आठवण

अस्तकाळचा प्रकाश पिउनी
माळावरती पडला वारा
धूसर डोहामधें नभाच्या
एकच आहे मलूल तारा.

ढगाळलेल्या क्षितिजाखालीं
अंधुक झाल्या मीलनरेषा
अथांग मौनामधें हरवल्या
धरतीवरच्या जीवनभाषा.

अस्तगिरीच्या आडोशाला
फणा काढला अंधारानें
उंच तरूंच्या स्कंधावरती
तटस्थ बसलीं हिरवीं पानें.

नीरवतेला तडे पाडते
रातखगांची कोठे साचल
खिन्न नदीच्या छातीवरचा
थरथरतो भीतीनें अंचल.

श्यामल मेघांचे ऐरावत
संथपणें आकाशीं भ्रमती
चराचरावर पंख पसरुनी
बसली आहे विषण्ण नियती.

या नियतीच्या अधिकाराला
आठवणींचा तुझ्या किनारा
उदासतेच्या वेलीवरती
माझ्यासाठीं असे फुलोरा.

## भी ति

मध्यरात्रिंच्या गाढ तमीं तूं धरलें हृदयीं मला
स्मरशिल का मज भय वाटे, दिन येतां उदयाचला !

तव कवेंत माझी गुदमरली तनुलता
उद्दाम चुंबनें अधरावर बरसतां
हृदयाशीं होतां हृदयाची एकता
नक्षत्रापरि उजळत जाळित गेलें गगनांगणीं
पंख द्युतीचे तोडशील का, हीच मना जाचणी !

मम नाव चालतां क्षुब्ध सागरावरी
प्रगटली दिव्यांची रांग निळ्या बंदरीं
ती अज्ञातांतिल दिसली अलकापुरी
रत्नखचित वेशींतुनि नेसी मला किनाऱ्यावरी
जीवनभर हें अपार वैभव अथवा घटकाभरी !

## बंदीवान

असे यायचें तुझ्याकडे पण
भयकर कारा माझ्याभंवतीं
खणखणती चहुंकडे शृंखला
उग्र पहारे दारावरतीं !

या तिमिरीं मी बंदिवान रे
दुर्बलतेची सदैव सोबत
तुझ्या प्रीतिचें स्वप्न देखतां
चिरे-शृंखला येथिल हांसत !

गवाक्षावरी गज लोहाचे
खोल तळाशीं वाट पुराची
पाहत बसते लोहांतुनि मी
चाहुल घेतें तव चरणांची !

काल लोटतो, दिनरात्रींचीं
अजस्र अवजड चाकें फिरतीं
विजनामधल्या शबल जलासम
जीवनकण शून्यांतच विरती !

परंतु केव्हां रात्र जागतां
प्रशांत नीरव पहाट कालीं
मूर्ति प्रगटते तुझी पथावर
दिसे दिव्याच्या स्तंभाखालीं !

अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों दि: ............
१६०८

जरा थबकशीं जरा थांबशीं
जरा पाहसी तटाकडे या
दीप विखरतो वरून तुजवर
प्रकाश अर्धा, अर्धी छाया !

त्या भासावर जातें जीवन
मृत आशेवर पुन्हा फुलोरे
असेल तुझिया मनांत कांहीं
तर लौकर ये-लौकर ये रे !

भय वाटे, मी अशीच जगतां
चिराच होइन इथें चिऱ्यांतिल
तिमिरामधली ज्योत अकेली
तिमिरामध्यें विलीन होइल !

## दि ला सा

गीत होऊनी अशीच लहरत
पुष्प होउनी अशीच बहरत
नादगंध वितरीत माझिया
जीवनमंदिरिं ये.

क्षीण दिवा येथिल एकांतीं
विद्ध पांखरासमान ज्योती
भिंतीवरती मूक सावल्या
उदास थरथरती.

तूं येतां या मलूलतेवर
उसासतो वासंतिक मोहर
अचेतनावर जीवनलहरी
येती उदयाला.

चैत्रासम हें वसंतवैभव
सतत संगतीमधें फिरे तव
सहकारांतिल कोकिलकूजन
परिमळुंदे येथें.

मार्गस्थच तूं, तुझ्या पथांतिल
ही पडशाला – विश्रांतिस्थळ
दूर तुझें मंझील, गमे ना-
इथें रहावें तूं.

सुखेनैव जा, हें स्मृतिसंचित
होइल मजला सांत्वन सोबत
पायखुणा तव उरतिल भवति
पुरे दिलासा तो.

## शि ला रू प मी

भक्तिभावना भावशील तव हृदयीं ओथंबुन
मंदिरांत तूं येशी माझ्या करावया पूजन.

ललित तुझें लावण्य पाहतां गमलें गगनांतुनी
पंख प्रभेचे पसरुन उतरे व्याधाची चांदणी.

प्रसन्नता वदनावर मंगल करांत नीरांजन
अमल भावना त्या ज्योतीसह उजळे नेत्रांतुन.

नयनदलें तीं मिटलीं क्षणभर – ढगामधें चांदणें
रुमझुमुनी क्षण वक्षावरती स्थिर झालीं कंकणें.

दिव्य मूर्तिवर तव लखलखले मंदिरांतले दिवे
देव जाहला भक्त तेधवां देवपणा मालवे !

शिलारूप मी उरलों, झालें देउळ बंदीघर
परत केधवां येशिल, जळतें – शिळेमधें अंतर !

## आहे ती व्यथेची

प्रीति ना आपुली
फुलांची कळ्यांची
कोमलपणाची
निथळे तिच्यांत असह्य वेदना
अखंड रणाची !

प्रीति ना आपुली
दंवाच्या थेंबाची
पर्णांत रंगली
विजेचा लोळ तो गर्जत जळतो
मेघांच्या जंगलीं !

प्रीति ना आपुली
गीतांची रसाळ
शब्दाची मंजुळ
लाटांचे डोंगर जोडीत फोडीत
तुफान वादळ !

प्रीति ना आपुली
चिऊची काऊची
पंखांची पिसांची
तिच्यांत रात्र ती विषण्ण काजळी
अज्ञातवासाची !

प्रीति ना आपुली
संतोष सुखाची
सारंगी बिनाची
आहे ती व्यथेची गहन दुःखाची
अथांग मौनाची !

## म स्ता नी

तुझ्या जीविताच्या चंद्रास माझ्या रे
प्रीतीचें चांदणें
तुझ्या नियतीच्या पायांत माझिया
भक्तीचीं पैंजणें

तुझ्या विषादास रेशमाची उशी
माझिया उराची
तुझ्या संगीतांत सोनेरी लकेर
माझीया स्वराची

तुझ्या वीरतेस
अपार तेजास
किनार रे माझ्या दिव्य लावण्याची

अमर कीर्तीच्या
तुझ्या वृक्षावर
विसावत वेल — माझ्या माधवीची !

## दे व्हा रा

हृदयांत आहे माझ्या
    एक एकान्त कोपरा
चिमुकला तुझ्यासाठीं
    तेथें चंदेरी देव्हारा

संसाराच्या कोलाहलीं
    नाहीं संवाद आपुला
नाहीं प्रेमभाव कधीं
    अक्षरांत आकारला

स्पर्शांतून स्मितांतून
    अपेक्षा न ओसंडल्या
फुलल्या ना नेत्रांतून
    भावपुष्पाच्या पाकळ्या

नदिकिनारीं न कधीं
    केलें कूजन मंजूळ
चांदण्यांत रचिलें ना
    कधीं स्वप्नांचें देऊळ

व्यक्ततेच्या पलीकडे
    माझें भावनापूजन
पार्थिवाच्या पलीकडे
    तुझें—माझें हें मीलन !

## अ श ब्द

तुझ्या पापण्यांच्या आंत
काय सांठलें दाटलें
दोन ओठांच्या दलांत
दंव कोणतें गोठलें !

उपचाराचें बोलणें
मध्यें तुटून थांबलें
क्षण अशब्द रिकामे
युगाप्रमाणें लांबले.

नेत्र मिळाले नेत्रास
नीट केलेस कुंतल
जरा कापत्या करानें
घेसी ओढून अंचल.

गोंधळल्या गालावरी
स्मित उमलें अधुरें
शब्द डोकावती कांहीं
ओठामधून घाबरे.

उभें संकोचाच्या आड
त्याची दिसली सावली

लाल रंगत उषेची
मेघामधे न मावली.

नको सांगूस कधींही
काय सांगायाचें आहे
अशा भाव–मोहनाचा
अंत अक्षरांत राहे.

# मीलन

जर असेल व्हायचें
कधी आपुलें मीलन
त्यांत नसावी परीक्षा
त्यांत नसावें बंधन !

त्यांत नसावी आसवें
त्यांत नसावा उन्माद
जीवकोषांत भरावा
मुक्त मधुर आनंद !

जर असेल व्हायचें
कधी आपुलें मीलन
त्यांत नसावें रिकाम्या
गोड शब्दांचें नर्तन !

कशा लावाव्या मशाली
पूर्ण चंद्राच्या शोधास
जिथे भक्तीचा सोहाळा
काय शब्दांची मिरास ?

मुग्ध कळीच्या पाकळ्या
मुकेपणांत फुलती
सांध्य रंगांचे प्रवाह
रातगंगेंत वाहती.

जर असेल व्हायचें
        कधी आपुलें मीलन
अशा प्रशान्त शांतींत
        व्हावें विलीन होऊन !

दहा दिशांच्या देवता
        उभ्या अचल नीरव
पडे थिजून चंद्राचें
        भूमिवरती मार्दव.

वारा थांबला वाटेंत
        तारा देखत राहिल्या
झाडांखालती लपून
        उभ्या असती सावल्या !

अशा निर्भर एकान्तीं
        खूण प्रीतीची पटावी
दोघांमधील दूरता
        युगायुगांची फिटावी !

अनुक्रम... दि:
क्रमांक... नोंद दि.

## कधीं गमे कीं

कधीं गमे कीं वादळ व्हावें
उन्मन होउनि तुझ्या दारचे
स्निग्ध दिवे विझवावे

कधीं गमे कीं बिजली व्हावें
संगमरवरी शिल्प-महालीं
जाळत जळत शिरावें

कधीं गमे कीं सागर व्हावें
लक्ष करांनीं संथ शांत तव
जीवन शोषुन घ्यावें

कधीं गमे कीं दिनान्त व्हावें
सवित्यासम तव प्रकाशवैभव
काळोखांत गिळावें

कधीं गमे कीं अघटित कांहीं
असें करुनिया तुझ्याच पाशीं
अवकाशांत मिळावें.

## प्र वा सी

मुक्त स्वैर मी प्रवासी
नको म्हणूंस रहावें
नको नेत्रांत व्यथेचीं
अशीं आणूंस आसवें !

मुशाफरीस माझ्या या
झाला आरंभ जेधवा
झालें लिखित ललाटीं
त्यास अंत न केधवा.

कधीं शिणतां होतों मी
पडशाळेंत विश्रांत
कधीं कंगाल कुटींत
कधीं प्रासादीं श्रीमंत !

औट घडीचा तळ तो
चार भिंतींत यातना
माळरस्त्याला चालते
माझी जीवनसाधना !

कधीं रात्रीचा काळोख
गीतरंगांत वाहतो
बाहूपाशांत मखमली
परिमळांत नाहतो !

परी केशरी हातांनीं
प्राची मजला जागवी
वाट अज्ञात पुढची
स्वामीप्रमाणें बोलवी !

नको म्हणूंस रहावें
माझा अखंड प्रवास
धर्म गतीचा हा माझा
माझें गतींत श्रेयस !

# अलौकिक

अलौकिकाच्या घरांतला हा अहेर आला तुला मला
तरल सुखाची द्रवते मादक चार दिशांतुनि चंद्रकला.

आज स्वर्गता कनककणांसम उनाड मातीमधें मिळे
शरिरें राहुनि शरीरतेचें काजळलेलें कवच गळे.

कधिं न रंगलें कल्पघनावर अद्भुत अवचित तें घडलें
नश्वर या दानांत अकल्पित एक चिरंतन सांपडलें !

आज पापणी नको भिजाया अधरावरती नको व्यथा
गहन रुपेरी शांतरसाची उकलत आहे दिव्य कथा.

आज शिगोशिग मत्त माधवी घटांत अपुल्या भरभरुं दे
या मातीवर अपार्थिवाचें स्वप्न घडीभर अवतरुं दे.

तिमिरावरती फुलावयास्तव तूं–मी झालों दोन दिवे
भूतभविष्यें जळुं दे अवघीं आज कशाचें गणित हवें !

नकोत अश्रू नको शब्द वा क्षणामधें क्षण हा जिरुं दे
जें मौनामधिं जन्मा आलें तें मौनांतच मोहरुं दे.

## गोपी

नदीकिनारीं कुंजवनांतुन
उदासवाणी गोपी चाले
भुरभुरती निटिलावर कुंतल
वसन तनूवर विगलित झालें.
खिन्न अचेतन डोहामधली
झाकळली नेत्रांत सावली
गालावरची उषा निरामय
धुक्यांत विरली
पुष्पवनावर हिमागमाची
छाया पडली !

*

शून्यामधली वाटचाल ही
शून्यच भंवती
गंधवती ना ना रसशाली
पृथ्वी झाली केवळ माती !
निखळे आकाशांतिल सुषमा
कुसुमांना नच उरे कुसुमता
गीतामधल्या स्वरलहरींच्या
श्रेणी थिजल्या
सृष्टीमधल्या पुसल्या रेषा
निराकारतेमध्यें मिळाल्या
जीवन चाले संज्ञेवाचुन

आज्ञेवाचुन
बसले वेढुन अवकाशांतिल
शून्य सनातन !
*
गोपी चाले—
पद मार्गावर पडे जडावुन
शिलेप्रमाणें
परिचित पथ तो, चरण चालती
जाणिवेविना
सरितेमधल्या जलाप्रमाणें !
पांढुरक्या कृश करांत एका
कटीवरी घट बिलगुन बसला
कसाबसा आपुल्या बळें तो
वंचित अप्रिय—
मुलाप्रमाणें !
*
कुंभामधलें श्यामल पाणी
अस्थिर चालीसह गलबलतें
विचलित होउन म्हणे घटाला
कधीं न घडलें तें हें घडतें !
या कटिवरती
प्रवास होतो अतुल सुखाचा
असली कीर्ति
या कुंभाचे ओठ टेकतां
नदीप्रवाहीं, चार दिशांनीं
अधीर लहरी धावत येती.

मिरवणूक ही
सुंदरतेच्या संगतींतली
मृदुल मुलायम स्पर्शविलासीं
कृतार्थतेची दे अनुभूती.
दिमाख दावी घटांतलें जल
उरल्या लहरी
नदींत झुरती !

*

पायतळींच्या वाळूलाही
कळलें कांहीं
म्हणती कण ते हृदयीं जळते
काय व्यथा ही !
जातां येतां नदी किनारी
आजवरी ना रुतलें पाउल
स्पर्शत वरवर चंचल जावी
या तळव्यांची नाजुक मखमल
परंतु आतां—
चपल गतीला आली जडता
स्वैरपणाला आली स्थिरता
स्पर्शसुखांतहि दीर्घ जाणवे
दाह तयांतिल !

*

बसलीं मौनामधे पांखरें
वृक्षावरती विषण्णतेनें
अगतिक होउन

विझून वाती दिवे उरावे
तशी तयांची माळ अचेतन !
विसरुन गेली
कंठामधलें अपुल्या कूजन
निळी भरारी पंखामधली,
सतेज चंचल नयनवर्तुळें
दंवांत भिजलीं.
रुद्ध गळ्यांतिल स्वर कुजबुजले
वृन्दावनच्या या राणीला
कालिंदीच्या प्रिय तनयेला
काय जहालें ?

काय जहालें पुसतीं पर्णें
कुंजावरुनी वाकुनि खाली
वादळ नसतां दुनिया त्यांची
भयार्त झाली !
त्या हिरव्या गर्दीतुन बघतीं
अर्धोन्मीलित सुमनें कातर
फुलतां फुलतां बावरलें तें
नवखें अंतर
मुदुल दलांचें रेशिम भिजलें
स्मित ओघळलें
थरथरले नव पराग गाळित
हृदयामधले
सुगंध केसर !

*

यमुनेमधल्या पाण्यावरही
उदासतेची पसरे छाया
या गोपीस्तव वाहत होती
दुथडी माया.

अडखळलें लहरींचें नर्तन
शिळेखालच्या फेनामधल्या
जलकणिकाही थिजल्या अवखळ
इंद्रधनूचे हृदयामधलें
टाकुनिया कण होती निश्चळ !
धीर मनाची ती हिमकन्या
झाली दुःखित !
ही प्रिय गवळण
कधीं क्रीडतां कधीं नाहतां
कधीं घडे काठावर भरतां
कधीं तयासह विहार करितां
वात्सल्याची अपार केली
तिजवर पखरण !

शब्दावाचुनि धगधगणारी
तिची पाहुनी विरहाकुलता
अमृतवाही यमुना झाली
अश्रु–सरिता !

*

काय जहालें पुसे तरूंना
थबकुन वारा

काय जहालें म्हणे दुखावुन
प्रदेश सारा
अचल मनाच्या आकाशासहि
श्वास तिचे ग्रीष्मासम खुपले
घनराशींच्या धवल कपाशींत
कांहीं रुतलें
अमित अंतरावरुन पश्चिमा
पूर्व दिशेला पुसे खुणावुन
काय जहालें ?

*

गोपी थांबे—
वाटचाल वळणावर अडली
इथेंच पडलीं
त्या पर्वाचीं प्रथम पाउलें !
या पाषाणावर लखलखती
त्या घटकेच्या कांचनरेषा
या रेतीच्या कणाकणावर
त्या कवितेची मुद्रित भाषा.
तरुवेलींचें झालें होतें
अवघें गायन
निथळत होतें या गगनांतुनि
सोम रसायन !
शिलातलावर बसली गोपी
तळहातावर कपोल रेलुन

गतकाळाच्या देवळांत या
हो प्रभुदर्शन !

*

याच शिलेवर
याच कदंबाखाली झालें
अलौकिकाशीं पहिलें मीलन
हात तयाचे
अवचित आले खांद्यावरती
घडलें अवचित पहिलें चुंबन !
भावभक्तिच्या धुंद प्रवाहीं
वाऱ्यामधल्या गंधधनासम
पुढें विसर्जित होउन गेलें
वाहत जीवन !

*

इथेंच बंधन निखळुनि पडलें
सुटला घरट्यांतील निवारा
ना भीती ना नीती रीती
उरे प्रीतिचा एक किनारा !
अचेतनावर मोहर आला
जडता सुटली
निराकार जें त्यास आकृती
परार्ध उमलें शून्यावरती
तिमिर जळाला उरली दीप्ती !
ऐहिकतेच्या ऐलतटावर

पार्थिवतेचीं
वसनें फिटलीं !

*

स्वप्न सरे तें
तुटलें कंकण
कोर तयाची ही उरलेली
शोधत राही घन तिमिरांतुन
अमित पोकळीमधें दिशांच्या
अपार शून्याच्या देशांतुन
अगतिक एकाकी वाटेनें
हारपलेलें
निज पुरतेंपण !

*

मथुरा नगरीमधें तयाच्या
पराक्रमाचा उगवे सविता
गोकुळचा तो गवळी झाला
दीनांचा दलितांचा नेता !
या विद्धांना हो संजीवन
मिळे दिलासा
परंतु येथें यमुनातीरीं
खरखरलेल्या रेताडावर
वेदीवरती सुनेपणाच्या
जळे उसासा !

अनुक्रम ... वि: ... नों. क्र: ...

स्मरते का रे प[illegible] तुज
येथिल प्रीती

आठवते का तुला सुपर्णा
वृन्दावनची भोळी माती !
गगन विहारी हे विहगेशा
झापित जातां पंख घनावर
धवल हिमानी गिरिशिखरावर
नक्षत्रांशीं करतां स्पर्धा
जिंकुनि अंबर

जाणवेल का हे हृषिकेशा,
कालिंदीवर वृक्षाखाली
भूतकाळचे जुळवित धागे
प्रीतीचें तव करीत पूजन
बसली आहे एक इथें ही
कृष्ण निराशा !

पराक्रमाच्या पायदळीं ही
चुरली प्रीती

अमर प्रीतिच्या पराभवाची
आर्त व्यथा ती

स्त्री जातीच्या नेत्रामधला
ओघळला तो अश्रु सनातन
गालावरती !

## श कु न्त ला

सहजमनोहर वल्कलमंडित
विलास नवतीच्या विभवाचा
तपोवनाच्या धवल फुलावर
थेंब पडे हा विमल दैवाचा.

गंधवती धरतीची कन्या
वृक्षांनीं धरली हृदयावर
लालनपालन तिचें कराया
लवलें पृथ्वीवरती अंबर !

नयनभाव तिज दिला मृगांनीं
दिली फुलांनीं गंधित आशा
मधुर अनघता दिली खगांनीं
दिली झऱ्यांनीं सलील भाषा

जलवलयांतचि तिचीं कंकणें
अधरावर अरुणाची लाली
रात्र गुंतली केशकलापीं
रहावया ये वसंत गालीं.

प्रणयाकुल हृदयांतिल अवघ्या
ही स्वप्नांची काय सांगता
सहज भावमय नादरंगमय
पूर्णरूप ही पावे कविता !

पूर्णताच खुपली शृंगारा
आश्रय शोधी तो करुणाचा
राजमंदिरीं शेवट झाला
सृष्टींतिल या रम्यपणाचा !

तांबुस मातीवर तेजाचा ताज चढविला तुवां
तुझ्या घरांतिल पणती झाली नगरामधला दिवा.
दरिद्रतेच्या धुळींत जेथें कलंडलेलें जिणें
कनकाच्या चरणावर लवुनी ललाट झालें किणें,
भग्न घराच्या भिंतीमधली शरमिंदी वेदना
यांत गवसली प्रतिभेला तव श्रेयाची भावना.
रुधिरमांस नाण्यांत तोलतो संसृतिचा ताजवा
जागविसी तूं भाविकतेनें हृदयांतिल केशवा.
केश कटीवर नयनिं आसवें देहावर लक्तरें
मानवता अनिकेत होउनी पृथ्वीवरती फिरे.
ज्या जमिनिवर मुद्रित झालीं विषण्ण तीं पावलें
तेंच तीर्थ हो, तिथें वाहिलीं तुवां आसवें फुलें
प्रेमपूजनीं कृतार्थ व्हाया जीवन हें मृण्मय
शब्द जाहले चिरे तुझ्यास्तव वाङ्मय देवालय.
साद मिळो वा शाप मिळो ही मशाल हातांतली
जळत राहिली, यांत साधना सार्थकता पावली.
असेंच चालो हवन मंदिरीं मंत्रांचें गायन
दूरस्थाचें थोर ऋत्विजा तुजला अभिवादन.

## वणवा

वणवा आला !
आकाश सीमेच्या अंधुक रेषा
दीप्तींत नाहती
अग्नींत रंगती
अधीर डोळ्यांनीं दुरून पाहती
विषण्ण विशीर्ण वनाच्या दिशेला
वणवा आला !

मलीन उदास निष्क्रिय भकास
पेटली पोकळी
नभाची सगळी
ज्वालांची केशरी प्रकाश सेना
येतसे वाहत जाळीत वना–
हजार हातीं !
वणवा आला !

जरठ कर्मठ बोजड झाडें
काटक्याप्रमाणें अजस्त्र खोडें
पाडीत जाळीत
एकाच ओळींत
मरण्यालायक मरत नाहीं जें
त्याजला मारीत
वणवा आला !

## इथें वसाहत

इथें वसाहत ही दगडांची
चहूंकडे या माळावरती
प्रवास विसरुनि कुणी प्रवासी
घेती कायमची विश्रांती !

उजाडतेचे हे रहिवासी
मुरुमामध्यें रुतून बसले
ना सुख ना भय नाहिं अहंता
हर्ष विषाद न हृदयीं कसले !

किती युगांच्या जळत्या लाटा
किती जगांच्या जीवनलहरी
असतिल गेल्या परंतु यांना
कुणी न तारी, कुणी न मारी !

असत कुठें समुदाय तयांचे
बेरिज केवळ हो जडतेची
कुणी तापसापरी अकेले
परी तपस्या नसे कुणाची !

मार्गस्थांनीं दिलें कुणावर
फासुनिया रंगाचें रोगण
देवपणा तो वरी तरंगे
दगडाचें हो आंतिल रक्षण !

रानलतांचे पाश कुणाच्या
गळ्यांत पडती कुसुमित कोमल
परी तयांना आकळती ना
सुवास अथवा मार्दव त्यांतिल !

दगडच सगळे दगडच सगळे
हंत न यांना आशा कांहीं
जीवन ना अस्तित्वच केवळ
कठोरतेनें लगटुन राही !

# यज्ञदेवता

या भुक्या स्थंडिलामधें
पडणार किती आहुती
दिसणार कधीं देवते,
तव पावन शुभदाकृती !

ही शतकाशतकांतुनी
चालली तुझी साधना
वाहिले तुझ्या पूजनीं
नद रक्ताश्रुंचे किती !

अभिलाषा मद झिंगले
पदतलीं दीन हो धरा
जय असुरांचे पाहुनी
विजनांत दडे संस्कृती !

बांधून तुझीं देवळें
तुज आळवितो दंभ हा
हें भूषण म्हणुनी तुझ्या
शृंखला पदीं घालती !

मंदिरें अमात्यालयें
तेथें न तुझें स्वागत
ये धुळींत खाली इथें
दुमदुमे तुझी आरती !

ये उजळत सवित्यापरी
    ये मिरवत मेघांवरी
गंभीर गर्जितांतुनी
    दे नव्या जगाची स्मृती !

# यमकें

—कोणत्या नदीच्या किनाऱ्यावरी
विश्वाच्या घड्यांत जीवन भरे
—कोणतें तत्त्व या व्यापांत स्फुरे—
" रेशन सरे ! "

काळाच्या दर्यांत गल्बत चाले
खोलून रत्नांचीं आकाशीं शिडें
परंतु कोठल्या किनाऱ्याकडे—
" थकलें भाडें ! "

कोणतें पुण्य अन् कोणतें पाप
—कोणती न्यायाची सत्याची वाट
भोंवती तमाचे दुर्घट कोट—
" दहाची नोट ! "

तेजाळ प्रज्ञेचे लागले दीप
उजळ संसार हो मानवाचा
घडतो नवीन जीवन—सांचा—
" नोटीस वाचा ! "

खामोष ! रेशन, घराचें भाडें,
दहाचे कागद, नोटीस, हाय !
याच्याचसाठीं मी जन्मलों काय ?
" —होय रे होय ! "

अनुक्रम 38809 वि: ...
नों: दि ...

# दीप लाव तो

प्रसन्न झाला देव मानवा
म्हणे, 'माग तुज काय हवें तें'
'शस्त्र हवें मज,' माणुस वदला
'साध्य सर्व हो पराक्रमातें.'

शस्त्र मिळालें, हो समरांगण
अवघ्या भूचें हृदयविदारी
माखुनिया रक्तांत राहिला
पुन्हा उभा देवाच्या द्वारीं।

'काय हवें तुज?' 'शस्त्र न पुरतें–
करील शास्त्रच मंगल जीवन
ज्ञानसाधनीं ये ईश्वरता
स्वर्गधरेचें करीन मीलन!'

शास्त्र मिळालें, शस्त्र मिळालें
स्वर्ग परी स्वप्नांतच राही
हतबल आणिक हताश मानव
पुन्हा प्रभूच्या सन्निध येई.

'काय हवें तुज?' 'बावरलों मी–
वाट दिसेना या तिमिरांतुन'
देव म्हणे– 'तुजजवळिंच आहे
दीप लाव तो, तव माणुसपण!'

## गा डी वा ला

झाडी सडकेवरी दुतर्फा
काळोखाची त्यांत पडे भर
दुडकत खरकत चाले गाडी
फुटका कंदिल एक धुरेवर.

गाडीवाला माजी सैनिक
आला होता जिवंत परतुन,
पुन्हा बसोनी अरुंद जागीं
हाकारित होता निज जीवन.

पिरगाळित पुच्छें बैलांचीं
थडथडणारा धरून कंदिल
सांगे आंतिल निद्रिस्तांना
रसाळ गोष्टी गतकाळांतिल–

'काय लढाई – किती भयंकर
कल्पना न येणार कुणाला
कळे न केव्हां कुठून माथीं
यमराजाचा पडेल घाला !'

हां हां करतें आंतुन कोणी
देत जांभई म्हणतें, 'आतां
देवदयेनें सरलें सारें
– किती राहिला अजून रस्ता ?'

' – देवदयाही सरली आतां,
कपडे जेवण कांहीं मागा
सगळें मोफत, काय मजा ती
रहावया सरकारी जागा ! '

' मजा कशाची !' कोणी कण्हलें,
' इकडे होत्या रांगा साऱ्या
झीट येउनी उन्हांत पडल्या
कुळवंतांच्या स्त्रिया बिचाऱ्या ! '

' स्त्रियांचसाठीं अमुच्या रांगा
लागत होत्या मोठ्या गांवीं
वेळ सुटीचा देश दूरचा
वाटे कांहीं चैन करावी—'

' छी छी ! ' कोणी म्हणे घृणेनें
' काळच होता सगळा ओंगळ
ना नीती ना लज्जा उरली
जनावरांचें जग तें केवळ ! '

खजील थोडा झाला सैनिक
आणुनि पण अवसान म्हणाला,
' काय सोसलें आम्हीं तिकडे
कल्पना न येणार कुणाला ! '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. 28128

गळ्यांत गिळलें गतकाळांतिल
काळोखांतुन गाडी चाले
खरखर केवळ हो चक्रांची
फुटका कंदिल हाले डोले !

## व र आ णि शा प

शिळधार पर्जन्य पडे हा
याच्या हृदयीं दया न माया
प्रकाशदाता पराभूत हो
पसरे भूवर धूसर छाया !

प्रासादाच्या पुढे तळाला
स्तंभावरती टेकुनि माथें
कवटाळुनिया मुलें उराशीं
बसली कोणी माता येथें !

विदीर्ण भिजलेल्या वसनाचें
अंगावर अपुरें आच्छादन
विरून गेलें घरदारासह
नीतीचें रीतीचें बंधन !

पुरें न हो अतृप्त भुकेचें
उदरामधलें जळतें काहुर
म्हणून बरसे शतधारांनी
वैर विधीचें हें माथ्यावर !

पिकतिल कोठें पिकोत शेतें
होइल धरती सधन सचेतन
परंतु येथें तडफडतें हें –
अगतिक मरणासमोर जीवन !

गगनांतुनि त्या बरसे अमृत
नेत्रांतुनि या झिरपे ज्वाला
सृष्टीचा वर वरून, खाली –
शाप मानवी जगतामधला !

# त्यांच्यासाठीं

देव जयांना माहित नाहीं
त्यांच्यास्तव देउळ
विशाल शिल्पें धूप नगारे
पूजेचा गोंधळ !

धर्म न उमजे त्यांच्यासाठीं
शतकांच्या संहिता
मृत शब्दांचीं कवळुनि थडगीं
बसलेली अंधता !

लुळे पांगळे पृथ्वीवर जे
कुस्करल्या चेतना
त्यांच्यासाठीं सोज्वळ सुंदर
स्वर्गाच्या कल्पना !

त्यांच्यासाठीं ज्यां न जाणवे
नीती हृदयांतिल
नरनारींच्या निर्बंधांचे
डुंबाया पल्वल !

माणुसकीचें प्रखर रूप ना
बघती जे पामर
त्यांच्यासाठीं दुबळे अश्रू
करुणेचे पाझर !

## रंग

पृथ्वीचा नकाशा
विविध रंगांचा
तांबड्या हिरव्या
पिवळ्या जांभळ्या
केशरी राखीया
अनेक छटांचा
विविध देशांचें
रंगीत मोहळ
मेजावरी माझ्या—
समोर पडे !

सहस्र वर्षांत
कितीक रंगारी
रंगवून गेले
घेऊन कुंचले
—तोफा रणगाडे
समशेरी भाले
रक्ताच्या पाण्यांत
मिसळोनी रंग
शिंपले सर्वत्र—
तयाचे सडे !

निघाले रंगांचे
विराट प्रवाह
—वादळी वेगानें
धावती व्यापती
पूर्वीच्या रंगांचे
उसळती ओघ
क्रोधाचा संग्राम
रंगांत रंगांत
इतिहास सारा—
रंगांची कहाणी
भयाण भीषण !

रंगामध्यें याच
मानवाची व्यथा!
रक्ताळल्या यांत
इतिहास कथा
—केधवां पडेल
मेजावरी अशा
—अनेक युगांनीं—
पृथ्वीचा नकाशा
एकाच शुभ्रशा
रंगाचा .... कारण
शुभ्रतेंत साऱ्या—
रंगांचें मीलन !

# बांधकाम

इमारत भव्य कुणा कुबेराची
राहतसे उभी,
लोखंड-चुन्याचा अजस्त्र सांपळा
कवचामधून
घेऊनिया शत मानवी जीव
देहावरी निज
डोकावत नभीं !

हातांतुन हातीं चालली साधनें
मजल्यावरून मजल्यावरी !
निःसत्व निष्पर्ण डहाळ्यांप्रमाणें
–हात हे मलीन
–विशीर्ण उपाशी
बांधकामावरी राक्षसी उंच
घालती सांखळी !

रस्त्यांत राहून प्रेक्षक म्हणे
काय हें आश्चर्य !
आश्चर्य खरेंच !
अमित युगांची तपस्या मावळे,
मातीच्या चित्रास द्यावया जीवन
उदार, संपन्न
झटली संस्कृति !

रंगीत रेशमी वसन उडालें
वादळी वाऱ्यांत,
उरली खालती भीषण फक्त
पशूची आकृति !
लोपलें शरीर, राहिलें उदर
जळून जीवन
राहिले कर !

चालूं द्या हातांनो, असेंच कार्य
इमले सगळे कराया पूर्ण
रक्ताचें घामाचें घालून पाणी
मातींत, तयाचा चिखल करा
आणिक उभारा
—हवेली भव्य !

तिच्यांत बसून आजचे राजे
नृपाळ किरीटाविना
भूपाल सैनिकांविना
छापील कपटे हिरवे निळे
राज्याच्या मुद्रेचे
बसून पेढींत विणतील जाळें
निर्दय कराल
ज्याच्यांत तुम्हीच सर्वस्वासह
भ्रमाल—फिराल
अखेरीं मराल !

चालूं द्या हातांनो असेंच कार्य
फिरूं द्या अशीच जीवितरहाटी
आयुष्य अवघें क्षणाचें शिणाचें
विश्रांतीसाठीं नि शांततेसाठीं
स्वर्गांत स्वागत कराया सिद्ध
वैकुंठाची पेठ
आहेच शेवटीं !

वि: ........
नों: दि: ........

## अहेर

अलौकिकाच्या घरांतला हा
अहेर आला तुला मला
अमर सुखाची द्रवते मादक
चार दिशांतुन चंद्रकला.

आज स्वर्गता कनककणांसम
उनाड मातीमधे मिळे
शरिरें राहुनि शरीरतेचें
काजळलेलें कवच गळे.

कधिं न रंगलें कल्पघनांवर
अद्भुत अवचित तें घडलें
नश्वर या दानांत अकल्पित
एक चिरंतन सांपडलें.

आज पापणी नको भिजाया
अधरावर ही नको व्यथा
गहन रुपेरी शांत रसाची
उकलत आहे दिव्य कथा.

आज शिगोशिग मत्त माधवी
घटांत अपुल्या भरभरुं दे
या मातीवर अपार्थिवाचें
स्वप्न घडीभर अवतरुं दे.

तिमिरावरती फुलावयास्तव
तूं मी झालों दोन दिवे
भूत भविष्यें जळुं दे अवघीं
आज कशाचें गणित हवें ?

नकोत अश्रू, नको शब्द वा
क्षणामधें क्षण हा जिरुं दे
जें मौनांतच जन्मा आलें
तें मौनांतच मोहरुं दे.

# स्मरण

तुझ्या माझ्या दोन उल्का भेट झाली आकाशांत
आठवते का ?

कालियाच्या श्वासापरी धुमसत होती रात
आठवतें का ?

दोन विश्वें सांधणारी जाळणारी तेजोरेषा
आठवतें का ?

उधाणून आल्या कांहीं निराकार अभिलाषा
आठवतें का ?

अंतरींच्या मौनाचेहि निनादले प्रतिध्वनि
आठवतें का ?

निमिषांच्या पंखावर निथळली संजीवनी
आठवतें का ?

चार क्षण प्रवासांत चार युगें सामावलीं
आठवतें का ?

अबोधाच्या स्मरणाची दीपमाला उजळली
आठवते का ?

मीलनाच्या किनाऱ्यानें वियोगाची चाले नौका
आठवतें का ?

संयोगांत ऐकूं आल्या दुराव्याच्या क्रूर हाका
आठवतें का ?

नियतीच्या गतीनेंच आलों क्षितिजाच्या तळीं
आठवतें का ?

घडलें तें गेलें सारें राहुनिया अंतराळीं
आठवतें का ?

पृथ्वीवर आतां झालों मातीमध्यें माती पण
आठवतें का ?

मातीलाहि बिलगली आकाशाची आठवण
आठवतें का ?

# केव्हां

असत्यावरतीं बांधुनि थडगीं
   नसत्यावर आरास करूं
रित्या मनांनीं दिनादिनांचे
   कालनदीवर कलश भरूं.

कवी म्हणाला सार्थच आहे—
   जीवित म्हणजे मूर्ख-कथा ही
मूर्खपणाच्या हन्त तळाशीं
   भयाण केव्हां जळे व्यथा ही.

## वि ज य

मानवाची प्रज्ञा चाले आकाशांत
ध्वज मिरवीत धरतीचा

गूढ रहस्याचें उघडलें द्वार
अनंताचें घर होय थिटें.

अणुरेणूचींहि उकललीं दलें
ग्रहगोल आले मेजावरी.

दूरतेस आतां जवळीक आली
अज्ञाताच्या वेली मोहरल्या.

मातीच्या पुत्रानें उभारले कर
आणिली भूवर स्वर्गता ही.

परी माउलीच्या डोळ्यामधें पाणी
व्यथेची पराणी अंतरांत.

नीलावर डोळे विजयाचा झेंडा
पायापाशी सडा रुधिराचा.

मातीच्या मुलारे दुखावली—आई
अगतिक होय ऐश्वर्यांत.

## करा दूर जरा हात—

तुझ्या स्मृतिसमाधीच्या
शिलेशिलेला वंदन
गेलें भागीरथीपरी
पृथ्वी शिंपीत जीवन.

तुझ्या जिण्याचा नकाशा
होतां चित्रित मनांत
गमे ऐहिकांत आला
पारलौकिकाचा हात.

कृश, दुर्बळ आकृति
वाळवंटांत चालली
लक्षावधि मानवांची
यात्रा मागुती धावली.

तुझ्या स्पर्शानें तमास
आली तेजाची पालवी.
ऋचा ऋषिवर्या तुझी
जड पाषाण चालवी.

परी असमर्थ झाले
प्रेमवेद तारायास
धनमत्तांची ग्रासते
आज जगाला मिरास.

कल्पवृक्षास ज्ञानाच्या
अणुगोलाचें ये फल
विनाशाच्या सावलीने
काजळलें धरातल.

देवापरी देव्हाऱ्यांत
राहे प्रेमधर्म आता
मंदिराच्या चौकामध्ये
पानपान जळे गाथा !

किती काळ रक्ताळलें
शरीर हें वाहायचें
कोठवर अंकुश हे
जखमेंत सहायचें ?

करा दूर जरा हात
दयामय प्रीतिमय
करा दृष्टि दूर जरा
स्नेहमय शांतिमय.

रणशील भावनांचा
पेटूं द्या हा दावानल
युगेंयुगें साठलेलें
जाळायासी अमंगल.

वैर द्वेष यांस आता
   घेऊं द्या हा अंत्य घास
माझ्या धरतीला घ्याया
   नव्या जीवनाचा श्वास !

# अं त र

कधिं पुनवेची रात होउनी येशी माझ्याकडे
सोमरसानें भरत शिगोशिग क्षणाक्षणांचे घडे.

तुवां केधवां उदार वारा मलयांतिल होउन
शिलातळांना दिलींस स्वप्नें, मातीला चंदन.

कधीं घनांच्या सौधावरुनी उतरे सौदामिनी
तिमिराचे तट दुभंग झाले घटकाभर जीवनीं.

इंद्रधनूच्या रंगकलांचा दिमाख दावित कधीं
तूं अलकेची वेस उघडसी शून्य प्रदेशामधीं.

कोकिलकूजित झालिस केव्हां ती द्रवतां माधुरी
सहकारावर दग्ध जांभळी मोहरली मंजरी.

असें तुझें ऋण – परंतु राहे दूर तुझें मंदिर
या दानास्तव अतूट झालें अपुल्यांतिल अंतर.

## दिवसासह सरले

दिवसासह सरले सगळे वादविवाद
ते शब्द बापुडे वाऱ्यावरचे नाद
वाऱ्यांतच विरले, उरलें मीपण एक
झंकारत ये तव त्या एकान्तीं साद!

मीं वितंड केलें म्हटलें, "तूं नाहीस."
किति दिले पुरावे, किती काढला कीस!
गगनांत दाटतां पण रजनीच्या छाया
"आहेस," म्हणे मन माझें, "तूं आहेस!"

झाडींत सावल्या जमूनिया कुजबुजती
तें रहस्य उमगुनि तृणपर्णें थरथरतीं
त्या ज्ञानगर्विता अमित चांदण्या व्योमीं
मम अगतिकता ही पाहुनिया स्मित करती.

## दान

आलास मला तूं दान दिलें
नवथरतेच्या सीमेवरती
स्वप्नफुलें नव देसी हातीं
अविनाशी मजला गमलीं तीं
ते बहर पथीं अवघे सुकले
मन अनघानंदा त्या मुकलें !

आलास पुन्हा मज दान दिलें
फुलतां भंवतीं यौवननंदन
तेजोकण उन्माद विमोहन
भासत तें सुखपूर्ण चिरंतन
ते दीप वादळीं मालवले
मन गुदमरलें तमिं बावरलें !

आलास पुन्हा दारांत अतां
दे दिव्य असें जें कधिं न ढळे
जें सुमन सुगंधित कधिं न गळे
जें प्रकाशमय हो, परि न जळे
जें गहन जान्हवीपरी पथा —
दे प्रशांतता, दे प्रसन्नता !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम .................... विः ....
नों: विः .

## अ भि सा रि का

मध्यरात्रीच्या तमांत
    दडे धरती आभाळ
कोठें चाललीस अशी
    पायीं वाजवीत चाळ ?

नववधूचा शृंगार
    अंगीं ल्यालीस साजरा
शाल दुशाल जरीची
    शिरीं मोत्यांचा गजरा.

दोन्हीं करांत बिल्वर
    रुणझुणत सोन्याचे
खानदानी तुझें घर
    नाहीं भय का कोणाचे ?

—जेथें भीतीचें किल्मिष
    गेलें शांतींत जिरून
जेथें तिमिराच्या लाटा
    झाल्या तेजांत विलीन

अशा प्रकाश शांतीच्या
    देशामधें मी चालले
तेथें सिंहासनावरी
    माझें साजण बैसले.

आजवरी दुरूनिया
झाला अनंगाचा खेळ
आल्या फुलांतुनि भेटी
आली झऱ्यांतुनि शीळ.

अशा खेळांत रंगून
काळ कंठला युगाचा
आतां मिठीसाठीं त्याच्या
बंध तोडला जगाचा !

त्याच्या अधराची आग
मला बोलाविते आज
पूर्ण सफलतेसाठीं
सारी सोडली मीं लाज !

तेथें चांदण्याचे दिवे
लाख ऐनेमहालांत
उभा विंझणास राहे
सिद्ध वसंताचा वात.

तेथें घटपात्रांमध्यें
पाणी आकाशगंगेचें
तेथें फुलदाणीमध्यें
गुच्छ रंगीत मेघांचे.

अशा ऐश्वर्यांचें आहे
माझ्या वल्लभाचें घर
तेथें जाण्यासाठीं हवा
असा साज देहावर

## मूर्ति

संगमरवरी मूर्तीचे तव
स्नेहल डोळे
त्यांत वाचलें उगाच कांहीं
गीत निराळें

उगाच गमलें अधरावरतीं
उमले हासूं
उगाच वाटे पापणीमधें
लपले आसूं

उगाचतेची धग ही माझ्या
मनास दाही
कळलें ना कीं देवळांत मी
एकच नाहीं.

ही शिल्पाची मात्र चातुरी
घडणच असली
आर्त भावना अहंपणानें
माझी फसली.

## मा ती चें गा य न

माझ्या मातीचें गायन
तुझ्या आकाश श्रुतींनीं
जरा कानोसा देऊन
कधीं ऐकशील का रे?

माझीं धुळींतील चित्रें
तुझ्या प्रकाश नेत्रांनीं
जरा पापणी खोलून
कधीं पाहशील का रे?

वर्ख लावून कागदी
माझें नाचतें बाहुलें
कधीं कराया कौतुक
खालीं वाकशील का रे?

माझ्या जहाजाचे पंख
मध्यरात्रींत माखले
तुझ्या किनाऱ्यास दिवा
कधीं लावशील का रे?

माझा रांगडा अंधार
मेघामेघांत साचला
तुझ्या उषेच्या ओठांनीं
कधीं टिपशील का रे?

## कारण

नृपाळ आम्हां पवित्र येथें
म्हणून देतों तुज सिंहासन
त्रिखंड म्हणतों राज्य तुझें हें
कारण आम्हां तें आलोभन.
कांचनवलयें करांत तुझिया
हार हिऱ्यांचा गळ्यांत शोभे
नवरत्नांचा मुकुट शिरावर
सहज न आम्हां हें धन लाभे !
वदन तुझें स्मितशाली सुंदर
रूप तुझें मोहक शोभामय
कारण अमुच्या पेटेमध्यें
सुंदरतेचा हो क्रयविक्रय !
तूं अविनाशी अमरण कारण
मरणाचें भय आम्हां अविरत
तूं करुणाकर उदार न्यायी
अन्यायांनीं भरलें जीवित !
जें जें नाहीं, हवें परंतु
तुझ्यांत त्याची करितों पूर्ति
अपूर्णतेंतुनि आम्ही अमुच्या
तुझी घडविली आहे मूर्ती !

## या त्रि क

तुझ्या दर्शनासाठी मी
आलों यात्रिक दुरून
खिळे पायरीशीं गति
तुझें ऐश्वर्य पाहून.

शुभ्र शिल्पाचें वैकुंठ
उभें पृथ्वीवर राही
शिलेशिलेंतून झरे
येथें मांगल्याची द्वाही.

तुझ्या निवासांत लाभे
शांत भक्तीस माहेर
आला सौंदर्याच्या घरीं
येथें शिवाचा अहेर.

दूर गाभाऱ्यांत तुझें
सांग पूजन गाजतें
माझी अशिव भावना
दारापाशींच लाजते.

दुमदुमतें संगीत
येथें अमल प्रीतीचें
माझ्या मनास माखले
कण शबल मातीचे.

तुझ्या स्फटिक मूर्तीचा
दिसे प्रकाश दुरून

गीतगंधानें येथील
गेलें जीवन भरून.
हाच अधिकार माझा
नाहीं अधिकाची आस
पायरीच्या रेषेवरी
माझा सफल प्रवास.

## आम्ही दोघे

मी आणिक मी आम्ही दोघे
एक घरामधले रहिवासी
दोन गांवचे, दोन दिशांचे,
हा रत येथें, हा वनवासी !

हा व्यवहारीं रंगुनि जातो
हिशेब करतो रुपये आणे,
नक्षत्रांच्या यात्रेंतिल तो
ऐकत राही अबोध गाणें !

मित्रसख्यांचा मेळा जेथें
तेथें त्याचें विसावतें मन,
हा एकाकी, हृदयव्यथेला
नाहीं त्याच्या कुठलें सांत्वन !

नीतिरीतिचा विवेक याला
प्रवाह घाटामधून वाहे,
स्वैर अनागर नागर जगीं तो
कसलें बंधन तया न साहे !

अलीपरी हा गर्दीमधुनी
विहार करतो रसज्ञ मार्मिक,
शून्य पथीं तो चिरंतनाच्या
ओझें घेउनि चाले यात्रिक !

मी आणिक मी आम्ही दोघे
वस्तीसाठीं एक परी घर
दोन ध्रुवांचें मीलन येथें
दोन ध्रुवांतिल राखुनि अंतर !

## वन्दन

माझें ईश्वरवंदन
   चाले अवकाशाकडे
गाढ अबोल भक्तीचीं
   शुभ्र पालवीत शिडें.

नाहीं मंदिरीं थांबत
   शब्दबंधांत रमत
त्याच्या अफाट चालीला
   नाहीं पृथ्विही पुरत !

एका वातीच्या भोवती
   नऊ पतंग भ्रमती
सूर्यमंडळ, तयाची
   काय असावी गणती ?

नका धूसर मेघांनो
   रोधूं तयाचा प्रवास
सांध्य आरुण प्रभेची
   दावूं तयाला आरास.

नको तेजाचा पिसारा
   पुढें नाचवूं दामिनी
नको असंख्य ताऱ्यांचा
   दावूं दिमाख यामिनी !

इंद्रधनूच्या वेशींत
   नाहीं थांबणार गति

चंद्रकरांच्या कुंजांत
नसे तयास हो रति
कालतत्त्व हो पांगळें
जेथें स्थिरावुन राही
अंत-अनंताचा कधी
जेथें जन्म झाला नाहीं –
जेथें अस्तित्व संपलें
राहे केवळ अभाव
शून्य शून्यांतलें जेथे
तेथे असे याची धाव !

## घ र मा ल क

असें कसें हो घरमालक हें
घर आम्हांला दिलें
फुटक्या कौलारांतुनि गळती
नक्षत्रांचीं फुलें.

अभेद्य भिंतींचे तट भवती
साकळलेली हवा
कवाड-खिडकी नसे दिसे ना
वाटेवरचा दिवा.

पेठ कोठली नगर कोठलें
मुलुख कोणता तरी
चिऱ्याचिऱ्यावर मारुनि धडका
प्रज्ञा फुटते उरीं.

दोन दिशांना दोन भुयारें
रहदारी व्हावया
काळोखाच्या दरींत तेथें
ना किरणांची दया.

शतशतकांची धूळ साचली
भूमीवर येथल्या
खांबांखाली विकट बैसल्या
हजार या सावल्या.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

प्रकाश आहे परंतु त्याला
अंधाराची व्यथा
जीवन आहे त्यास बिलगली
पण मरणाची कथा.

गहन सनातन चिरेबंद या
तमांत कां राहणें
मातीच्या शय्येवर स्वप्नें
मेघांतिल पाहणें.

सदन देउनी वनवासांतिल
दिला एकलेपणा
तऱ्हा अशी वर कधिं न दावितां
निज चरणांच्या खुणा.

असें कसें हो घरमालक हें
घर आम्हांला दिलें
या सौद्यांतुनि काय तुम्हाला
आम्हाला लाभलें ?

## न व्या जी व ना चा ना द

नव्या जीवनाचा नाद
मला ऐकूं येत आहे
लक्ष शून्यांतुनि कांहीं
श्रेय आकारत आहे.

क्षितिजाच्या काळोखाला
फुटे सुवर्णाचें पान
आकाशाच्या ओंजळींत
पडे किरणांचें दान.

गेल्या दिवसानें दिली
येत्या दिवसाला हांक
अभावांत रुतलेलें
हाले चैतन्याचें चाक.

दऱ्याखोऱ्यांत शेतांत
लाट तेजाची वाहते
अहंभावाच्या रसांत
दीन दारिद्र्य नाहतें.

पायतळीं पाषाणास
आहे कांहीं म्हणायचें
संपलें तें पर्व आतां
रडायचें कण्हायचें

धरतीच्या उदरांत
आली कोळशाला जाग
अंग आसुसलें त्याचें
व्हाया इंधनाची आग.

माती हालते शेतांत
पाणी पिऊन मेघांचें
चिखलाच्या नेत्रावर
स्वप्न सोनेरी रेघांचें

गंधप्रकाशाचा स्वर
त्यांत झंकारत आहे
लक्ष शून्यांतुनि कांहीं
श्रेय आकारत आहे

# ध्व ज गी त

माझ्या भारताचा ध्वज
उभा अजिंक्य आकाशीं
नव्या मनूचा प्रवास
याच्या मंगल प्रकाशीं.

संतमुनींचा ऋषींचा
याला आशीर्वाद मिळे
लक्ष जीवनांची ज्योत
याच्या पायापाशीं जळे.

माझ्या भारताचा ध्वज
निळ्या आकाशांत डोले
उषेसंगतीं नक्षत्र
येथें उदयाला आलें.

याला अरुण देवानें
भाळीं लावलें केशर
मायदेशास मिळाला
त्यांत वीरतेचा वर.

पूर्ण चंद्रानें तयास
दिलें चांदणें नितळ
स्नेहशांततेची भव्य
उभी राहे दीपमाळ.

सस्यशामल धरेनें
दिलें ऐश्वर्य मातीचें
सूर्यचक्रानें अर्पिलें
व्रत अखंड गतीचें.

माझ्या देशाच्या दैवता
तुला सहस्र वंदन
तुझ्या रक्षण–सेवेंत
होवो कृतार्थ जीवन.

# स ह्या द्रि

अनेक पर्वत विशाल भूवर
गौरव त्यांचा सतत ऐकतों
कुठें वाचतों
परंतु माझा सह्याद्री हा
भावभक्तिला सदैव माझ्या
मोहित करितो !
हिमाचलाची हीरकरशना
लखलखते ती क्षमाकटीवर
स्तंभ रुपेरी हा विजयाचा,
जिंकित अंबर,
सुरांगनांचा सुरम्य दर्पण
गंधर्वांचें रसमय गायन
कैलासाच्या स्फटिक महालीं
वसती शंकर !
युरोप खंडामधील पर्वत
भव्य हिमानी
वसुंधरेचें विलासमंदिर
आरस्पानी
अमेरिकेंतिल, अतिपूर्वेंच्या
गहन कृष्ण त्या वनभूमीच्या
भूधरमाला विविध विराजत,
अमरपतीचें

मिरवित वैभव भूलोकावर
ते ऐरावत !
मान्य महती दिमाख त्यांची
त्यांचें वैभव येथें नाहीं
खंत न कांहीं,
देवमुनींची ना रहदारी
नक्षत्रांच्या पेठेंतिल ना
हा व्यापारी.
परंतु याच्या गहन दऱ्यांतुन
इंद्रनील पांचूंच्या खाणी
सौंदर्यातुनि लहरत याच्या
हिरवीं गाणीं
साध्या भोळ्या मराठमोळ्या
या रुपाची
मला शिराणी !
हा धरतीचा धरतीसाठीं
त्यास असे प्रिय कातळ माती
दीन दरिद्री अशा जनांच्या
हात तयाचे पाठीवरती,
मनास माझ्या
देत दिलासा अपार त्याची
वत्सलता ती !
वत्सलतेसह कठोरताही
शिळे शिळेवर तळपत राही

तेजोरेषा,
खडक पहाडांतून निनादे
नरसिंहांची गर्जित भाषा !
यांतुनि सरिता
मृत्युंजय दीप्तीच्या निघती
उकलित दगडामधील ज्योती
विळ्या नांगर हातावरी वज्रता
न्यायाकरितां !
भूगोलाच्या वा कवितांच्या
ग्रंथांमध्यें त्यांची महती
परंतु माझ्या सह्याद्रीचा
मुद्रित हो रणशाली गौरव
इतिहासाच्या पानावरती !

# कांहीं जीवनलहरी

अनुक्रम 58809 दि: ...
क्रमांक ........ नोंद दि ......
१६७८ 78

## कांहीं जीवनलहरी

विजयाच्या वेशीवर
स्वागत मम करण्याला
ये अथवा येउं नको
त्याची नच खंत मला.
        हिमशीतल अपजयांत
        साकळतां गडद रात
मम व्यथेस मात्र दिसो
क्षितिजावर दीप तुझा.

*

पंख गळत शब्दांचे
आज तुझ्या सांगाती
नावाविन भाव असे
अद्भुत हे अवतरती
        सांध्य मेघमंडलांत
        इंद्रकोश उकलतात
म्हणुं नकोस या घनास
ऐहिक आकार हवे !

*

गजबजतों मी जगांत
वर्तुळ हें हो विशाल
जें असे नसे तयास
रूपरंग दे मशाल.

कोटरांत केव्हां पण
दडतां हें माझेंपण
गहन गूढ पोकळींत
कणिका मम भ्रमत बसे.

*

ही घटका — कीर्ति तिची
माथ्यावर ताजतुरा
वाद्यांचा गजर पुढें
निथळे मार्गांत सुरा

आज न तो डौलथाट
नागापरि क्रमत वाट
तिमिरासह येउनि ही
तिमिरांतच दंश करी.

*

देउळ ना – या घरांत
मातीचा गंध असे
ना तुझ्यासमोर इथें
दीपमाळ तेवतसे
चाले नच पूजार्चन
भक्तांचें संकीर्तन
मजपुरतें दैवतपण
आणसि तूं कोठुन हें !

*

कारागृहिं बंधनांत
भावबंध जन्मत हा
गगनांतिल गीत निळें
शृंखलेंत शोधिल हा.
पेटवावयास दिवा
तिमिर हा असा हवा
जावया अपार्थिवांत
धरतीचा शाप हवा !

*

तोनाहीं - मी म्हणतां
डोंगरतट कुजबुजती
आर्द्र दयाशील नेत्र
खिळवी नभ मजवरती
थरथरतें गवत तळीं
लवते शरमून कळी
लक्ष हात उचलुनिया
गर्जतसे रत्नाकर !

*

एक शून्य उलगडलें
अमित जन्मलीं तयांत
वैर पेटलें भयाण
शून्यांच्या या जगांत
चाटित जिभल्या कराल
नेत्रांतुन भूक लाल
कालशून्य तें विराट
पृथ्वीच्या दारिं बसे.

*

अनुक्रम ...3.८८९९... दि: ......
नों दि: ......

निर्भयता दे मनास
भाव सुजन अंतरास
प्रज्ञेचा दीप सतत
उजळ करो जीवनास

जुलुम अनय यांत वैर
विफलतेंत अचल धीर

मानवता हीच असो
परमधर्म संहिता.

*

निबिड अरण्यांत अशा
सर्पापरि वाट घुसे
तिमिरावर नजर फुटे
माझेंपण मज न दिसे

अवघा आकार विरे
आत्म्याचें भान नुरे

जाणवते एक गती
जीस नियंता न कुणी !

*

३.५/८९ वि: ५१८५
२८-९-६४
१६७८

मातीच्या चित्रांना
नांव दिलें, गांव दिलें
मातीच्या चित्रांना
तूं अखेर भाव दिले

हृदयीं तव सार्थकता
कौतुक बघुनी फुलतां
मातीच्या चित्रांनीं
देवा, तुज अश्रु दिले !

*

१४८२८